# जिल्हा उद्योग केंद्र, अकोला

## दिनांक २१.१०.२०११ रोजी संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे कार्यवृत्त.

जिल्हा उद्योग मित्र समिती सभा **मा. श्री. परिमल सिंह, जिल्हाधिकारी, अकोला** यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २१/१०/२०११ रोजी संपन्न झाली. सर्व प्रथम मा. जिल्हाधिकारी, यांचे महाव्यवस्थापक यांनी स्वागत केले. मा. अध्यक्ष महोदयांचे परवानगीने विषयसुचिनुसार सभेस सुरूवात करण्यांत आली.

## मागील सभेतील प्रलंबीत मुद्यं

| मुद्या क्रमांक | सभेचा विषय | सभेमध्ये झालेली चर्चा |
|---|---|---|
| १ | ट्रान्सपोर्ट नगर मधील जागा नवीन उद्योगाकरीता उपलब्ध करून देणेबाबत- | अकोला विकास केंद्रातील ट्रान्सपोर्ट नगर येथील भूखंड वाटप करण्याचे दष्टीने मा. जिल्हाधिकारी यांनी ट्रान्सपोर्ट असोसिएशन यांचेशी सभा घेउन जास्तीत जास्त वाहतुकदारांना स्थानांतरीत करण्याकरीता प्रोत्साहीत करण्याचे प्रयत्न केलेल आहेत. त्यामुळे शहरातील वाहतुकीवर नियंत्रण राहिल या दृष्टीने प्रयत्न करण्यांत आला. तथापि मागील भूखंड धारकांनी ब-याच कालावधीपासून तेथे व्यवसाय सुरू न केल्यामुळे त्यांचे भूखंड परत घेण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना मा. अध्यक्षांनी दिल्या होत्या. सभेमध्ये या बाबत चर्चा झाली असता प्रत्यक्ष वाहतुकदारांना व संबंधित उद्योजकांना भूखंड न दिल्यामुळे विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीजच्या पदाधिका-यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच ट्रान्सपोर्ट असोसिएशन च्या पदाधिका-यांनी मा. पालकमंत्री यांचेकडे तक्रार केल्याचे त्यांनी सांगितले ट्रान्सपोर्ट नगरमधील भूखंड वाटप करतांना अशा प्रकारच्या तक्रारी येउ नयेत असे मा. अध्यक्षांनी क्षेत्र व्यवस्थापक , मऔविमं अमरावती यांना सूचित केले. तसेच ट्रान्सपोर्ट नगर मधील उपलब्ध व वाटप केलेल्या भुखंडाची यादी व नकाशा दोन्ही इंडस्ट्रीज असो. यांना द्यावी असे मा. अध्यक्षांनी मऔविमं. चे. प्रतिनिधीस मागील सभेत सुचित केले होते. या बाबत चर्चा झाली असता.. ..<br>**ज्या भुखंड धारकांना भुखंड वाटप होऊन, भुखंड विकासाचा सात वर्ष / पाच वर्ष कालावधी संपुष्टात आलेला आहे, अशांना कारणे दाखवा नोटीस यापुर्वीच निर्गमित करण्यात आलेल्या असुन ज्यांनी भुखंड विकासासाठी काही परिणामकारक टप्पे घेतले असतील अशांना मुदत वाढ (पाच वर्ष पर्यत) देण्यात येवु शकते. त्यामुळे ज्यांनी भुखंड घेवुन व्यवसाय सुरु केले नाहीत असे भुखंड टप्प्या टप्पयाने क्रमानुसार नोटीसेस निर्गमित करुन परत घेण्याची प्रक्रिया करावी लागत असल्याचे क्षेत्र व्यवस्थापक यांनी सभेत सांगितले. वाहतुक व्यवसायाशी ठरवुन दिलेल्या Activity करीताच अर्जदारांना भुखंड वाटप करण्यात आलेले असुन ज्या अर्जदारांनी ट्रान्सपोर्ट Activity शी संबधीत व्यवसायाकरीता अर्ज केले अशाच अर्जदारांना भुखंडाचे वाटप करण्यात आलेले असल्याचे त्यांनी सभेत सांगीतले. याबाबत भुखंड निहाय वाटप व उपलब्ध भुखंडाबाबतची माहिती NIC च्या वेबसाईटवर टाकण्याचे व औद्योगिक सघटनांना उपलब्ध करुन देण्याचे निर्देश मा. अध्यक्षांनी दिले.** |

| | | |
|---|---|---|
| २ | ग्रोथ सेंटर ते शिवनी -शिवापुर गुडस् शेड मधील अप्रोच रोडबाबत- | सदर कामाचे टेंडर मा. अधिक्षक अभियंता मऔविमं., अमरावती कार्यालयात उघडण्यात आले आहे. व मंजुरीकरीता वरीष्ठांकडे पाठविण्यात आले असून, मंजुरी प्राप्त होताच कामास सुरूवात करण्यात येईल असे कार्यकारी अभियंता मऔविमं. हयांनी कळविले आहे. तसेच मराविविकं. यांनी मऔविमं. यांना सुचित न करता 33 KVA लाईन टाकली आहे. त्यामुळे अप्रोच रोड तयार करण्यास अडचणी निर्माण झाली आहे. यावर याबाबत चौकशी व्हावी असे विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्री यांनी मागणी केली असता, मऔविमं. व मराविविकं. यांनी संयुक्तपणे स्थळ निरीक्षण करून मा. जिल्हाधिकारी यांना अहवाल सादर करण्याबाबत मागिल सभेत ठरले होते.<br>**सदर ३३ KVA विद्युत वाहिनी महाराष्ट्र विद्यूत वितरण कं यांनी एमआयडीसी ची परवानगी न घेता टाकली असल्याचे कार्यकारी अभियंता यांनी सभेत सांगितले. सदर लाईन योग्य स्थळी स्थलांतरीत करण्याबाबत विनंती करण्यात आल्याचे उप अभियंता यांनी सभेत सांगीतले परंतु त्यांचे कडुन प्रतिसाद मिळत नसल्याने एम.आर. ॲन्ड टी.पी. ॲक्ट अन्वये कार्यवाही करण्याचे काम हाती घेण्यात आले असुन पोच रस्त्याच्या कामी असलेला अडथळा दुर करण्यात येत असल्याचे उप अभियंता म.औ.वि.म. विभाग-२, अकोला यांनी सभेत सांगितले. याबाबत त्वरीत कार्यवाही करण्याच्या सुचना मा. अध्यक्षांनी दिल्या.**<br>**कार्यवाही :- प्रा.अ. मऔविम / कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कं.** |
| ३ | एमआयडीसी क्षेत्रात कामय स्वरूपी पोलीस स्टेशन स्थापन करणेबाबत- | मा. पोलीस अधिक्षक यांचे दि. ०१/११/२०१० चे पत्रानुसार प्रादेशिक अधिकारी, मऔविमं. यांनी पोलीस विभागास पाठविलेल्या दि. ०९/१२/२०१० च्या पत्रान्वये पोलीस विभागाकडून कागदपत्रांची पुर्तता न झाल्यामुळे भुखंड वाटपाची कार्यवाही प्रलंबीत आहे. असे प्रादेशिक अधिकारी, मऔविमं. यांनी कळविले होते. याबाबत चर्चा झाली असता **पोलिस अधिक्षक कार्यालयाकडुन दिनांक ०९/१२/२०१० च्या पत्रानुसार कागदपत्राची अद्यापपर्यत एमआयडीसी च्या कार्यालयात पुर्तता करण्यात आलेली नसुन, पोलीस विभाने एमआयडीसी क्षेत्रात पोलीस स्टेशन करीता उपयुक्त असणा-या जागेची निश्चिती (Location) एमआयडीसीच्या संबंधीत अधिका-यांशी सल्ला मसलत करुन ठरवावी जेणे करुन तसा प्रस्ताव प्रादेशिक कार्यालया मार्फत मुख्यालयास सादर करणे शक्य होईल क्षेत्र व्यवस्थापक यांनी सभेत सांगितले.**<br>**पोलिस स्टेशन करीता जागा निश्चित करणे / पसंती दर्शविणे या बाबी पोलीस विभाग व एमआयडीसी अधिका-यानी संयुक्तपणे करावयाचे आहे. याबाबत दि. ०९/०६/२०११ रोजी मा. पोलीस अधिक्षक व उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई यांचे उपस्थितीत चर्चा करण्यात आल्याचे एमआयडीसी च्या अधिका-यांनी सभेत सांगितले. पोलीस अधिक्षक यांच्या सहीने प्रस्ताव तयार करुन एमआयडीसीस सादर करावा व त्याची एक प्रत मा. जिल्हाधिकारी यांना देण्याच्या सुचना मा. अध्यक्षांनी दिल्या.**<br>**कार्यवाही :- पोलीस विभाग / प्रा.अ.म.औ.वि.म.** |

| | | |
|---|---|---|
| ४ | मलकापुर रोड ते रेल्वे अंडर बायपास MIDC-II मधील अप्रोच रोडबाबत- | सदर रस्त्याचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा परिषद यांनी तयार केले असून, अंदाजीत किंमत रू. ७७,४००/- एवढे असून ते जिल्हा नियोजन कार्यालयास सादर केलेले आहे. असे उप अभियंता, (सा.बा.वि.) यांनी सभागृहात सांगीतले तथापी त्यास बराच कालावधी झालेला असुन ते सुधारीत दराने करावे लागेल असे त्यांनी सुचविले. सदर रस्ता जिल्हा नियोजन कार्यालयामार्फत मा.आमदार किंवा खासदार निधीतून पूर्ण करण्याच्या सुचना मा. अध्यक्षांनी दिल्या होत्या.<br>**उप अभियंता, सा.बां., जिल्हा परिषद यांनी सुधारीत अंदाज पत्रक त्वरीत सादर करण्याच्या सुचना मा. जिल्हाधिकारी यांनी दिल्या.**<br>**कार्यवाही :- उप अभियंता सा.बां. जि.प.** |
| ५ | अतिरिक्त विभागीय MIDC कार्यालय अकोला येथे कार्यरत करण्याबाबत | याबाबत MIDC यांनी प्रस्ताव तयार करून ७ दिवसाचे आंत त्यांच्या मुख्यालयास पाठवावा व तसे मा. जिल्हाधिकारी यांना कळवावे असे मा. अध्यक्षांनी मओविमं. चे प्रतिनिधी यांना सुचित केले. तसेच प्रा.अ. यांच्या आठवडी भेटी नियमीतपणे होत नाहीत त्यामुळे उद्योजकांना त्यांच्या कामात नेहमीच अतिशय त्रास होत आहे. असे अध्यक्ष, अकोला इंडस्ट्रीज असो, अकोला यांनी मागील सभेत सांगीतले होते. याबाबत पुन्हा चर्चा झाली असता क्षेत्र व्यवस्थापक यांनी, **मा. अध्यक्षांच्या आदेशानुसार प्रादेशिक अधिकारी, कामकाजाच्या आवश्यतेनुसार अकोला येथे येतात परंतु कधीकधी प्रशासकिय कामकाजामुळे येणे शक्य होत नसल्याचे क्षेत्र व्यवस्थापक यांनी सभेत सांगितले. तसेच अतिरिक्त विभागीय कार्यालय अकोला येथे कार्यरत करण्याबाबतचा प्रस्ताव प्रादेशिक अधिकारी यांचेकडुन लवकरच मुख्यालयास सादर करण्यात येईल असे क्षेत्र व्यवस्थापक यांनी सभेत सांगितले.**<br>**कार्यवाही :- प्रा.अ. मऔविम** |
| ६ | अकोला ग्रोथ सेंटर मध्ये नवीन प्लॉटस् उपलब्ध करणेबाबत | अकोला ग्रोथ सेंटर मध्ये भुखंड वाटपाबाबत चर्चा झाली असता दि .२७/०१/२०११ व २८/०१/२०११ घेण्यात आलेल्या LAC मध्ये पात्र ठरलेल्या अर्जदारापैकी ज्यांनी भुखंडाची इसारा रक्कम भरणा केलेली आहे. अशा अर्जदारांना दिनांक ०८/०६/२०११ रोजी ड्रा पध्दतीने भुखंड क्रमांक काढुन दिनांक १७/०६/२०११ रोजी एकुण ५२ अर्जदारांना वाटप पत्र (Allotment order) निर्गमित करण्यात आल्याचे क्षेत्र व्यवस्थापक यांनी सभेत सांगितले.<br>त्याच प्रमाणे आता पुनश्च दि. ०९/०६/२०११ रोजी १०८ अर्जदारांच्या LAC मध्ये अर्जदारांच्या मुलाखती घेण्यात आले असुन भुखंड वाटप समितीचे इतिवृत्त (Procceding) पात्र / अपात्रतेच्या अंतिम मंजुरीकरीता प्रादेशिक कार्यालयामार्फत मुख्यालयास सादर करण्यात आले होते. सदर इतिवृत्त मंजुर झाले असुन भुखंड वाटपाची प्रक्रिया सुरु असल्याचे सभेंत महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांनी सांगितले. ज्या अर्जदारास पात्र ठरविण्यात आले आहे अशांना त्वरीत भुखंड उपलब्ध करुन देण्याबाबत मा. अध्यक्षांनी सुचना दिल्या. यावर भुखंडाचा आराखडा मंजुर न झाल्यामुळे देकारपत्र प्रलंबित ठेवण्यात आले असुन भुखंड अतिशय दुर उपलब्ध करुन दिल्यामुळे भुखडंधारकांनी नाराजी व्यक्त केली होती असेही महाव्यवस्थापक यांनी सांगितले.<br>औद्योगिक संघटनेच्या विनंतीनुसार वाटप केलेल्या भुखंडांचे विकास (रस्ते, विद्युत व पाणी) त्वरीत करण्याच्या सुचना मा. अध्यक्ष यांनी उप अभियंता, म.औ.वि.म. यांना दिल्या.<br>**कार्यवाही :- प्रा.अ. म.औ.वि.म.** |

| | | |
|---|---|---|
| ७. | अकोला येथे इंडस्ट्रीयल लायब्ररी उभरण्याबाबत-(अकोला इंडस्ट्रीज असोसिएशन) | अकोला औद्योगिक परिसरामध्ये औद्योगिक विषयासंबंधित सर्व कायदे, नियम-अधिनियम, उद्योगासंबंधी शासनाच्या सर्व योजना इत्यादी माहीती उद्योजकांना व्हावी या करीता इंडस्ट्रीयल लायब्ररी उभरण्याकरीता निधी द्यावा अशी मागणी संघटनेने केली असता DPDC कडून तशी तरतूद करून घेता येईल. तसा प्रस्ताव MIDC च्या मुख्यालयास दि. १४/१२/२०१० च्या पत्रानुसार सादर करण्यात आलेला आहे. असे मऔविमं. च्या अधिका-यांनी मागील सभेत सांगीतले होते.<br>**याबाबत इंडस्ट्रिज असोसिएशन अकोला यांचेकडील इमारतीमध्ये जागा उपलब्ध करुन देणार असल्याचे संबंधीत पदाधिकारी यांनी सभेत सांगितले असता त्यानुसार सविस्तर प्रस्ताव सादर करण्याबाबत मा. अध्यक्षांनी निर्देश दिले.**<br>**कार्यवाही :- प्रा.अ. म.औ.वि.मं.** |
| ८ | में. सिंघल ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज, एमआयडीसी फेज ४, अकोला ग्रोथ सेंटर अकोला यांचे तक्रारी बाबत - (अकोला इंडस्ट्रीज असोसिएशन) | में. सिंघल गृप ऑफ इंडस्ट्रीज, या भुखंड धारकास मुख्यालयाचे निर्देशानुसार मुदतवाढीकरीता अधिमुल्याचा भरणा करण्याबाबत कळविण्यात आले असता त्यांनी अधिमुल्याचा भरणा न करता निःशुल्क मुदतवाढ व तारणाचे संमतीपत्र मिळावे म्हणून निवेदन दिले आहे. करीता घटकाची मुळ नस्तीसह सुधारीत प्रस्ताव दि. १९/०४/२०११ रोजी मुख्यालयास पुन्हा सादर करण्यात आला आहे. असे मऔविमं. प्रतिनिधींनी सभेत सांगीतले.<br>**याबाबत मुख्यालयाकडील आदेशानुसार भुखंड धारकास पुनश्च अतिरिक्त रक्कम जमा करण्याबाबत कळविण्यात आले. तथापी अद्याप सदर रक्कम अप्राप्त असल्याने मुदतवाढ मंजुर करण्यात आली नसल्याचे उप अभियंत, म.औ.वि.म. यांनी सभेत सांगितले.**<br>**कार्यवाही :-प्रा.अ. मऔविमं.** |
| ९ | VAT कायदया बाबत- | अकोला औद्योगिक क्षेत्रामध्ये उद्योजक VAT Tax Refund करीता दिनांक ३१ मार्च रोजी रिटर्न भरून चलानद्वारे जमा करतात. तथापी त्यांना मागील वर्षाचा परतावा मिळण्यापुर्वी नवीन वर्षाचा VAT Tax भरावा लागतो. तरी ही विसंगती दूर करण्यासाठी कार्यवाही करण्यांबाबत औद्योगिक संघटनेने कळविले असून, याबाबतची कार्यवाही लवकरात लवकर व्हावी अशा सुचना मा. अध्यक्षांनी मागील तीन्ही सभेत दिल्या होत्या. परंतू विक्रीकर अधिकारी मागील तीन्ही सभेला पत्र देवून व फोन द्वारे कळवून सुध्दा हजर राहिले नाही असे श्री. राजकुमार बिलाला व श्री. कमलेश वोरा, उपाध्यक्ष विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीज अकोला यांनी सभेस अवगत केले असता, मा.अध्यक्षांनी तीव्र नाराजी व्यक्त केली व विक्रीकर विभागास सभेस न चुकता हजर राहण्याबाबत पत्र देण्याच्या सुचना मा. अध्यक्षानी महाव्यवस्थापक, यांना दिल्या.<br>**कार्यवाही :- विक्रीकर विभाग** |
| ९ | आकोट एमआयडीसी येथे MSEDCL कडून सबस्टेशनची उभरणी करणबाबतचा प्रस्ताव जागे अभावी प्रलंबीत. | हयाबाबतचा प्रस्ताव MSEDCL हयांनी मुख्यालयास पाठविला आहे. तसेच याकरीता विभागीय अधिकारी, मऔविमं., अमरावती हे MIDC Aminity मधील जागा उपलब्ध करून देणार असल्याचे व तसा प्रस्ताव अद्याप पावेतो ही त्यांनी मुख्यालयास सादर न केल्याचे सचिव, आकोट एमआयडीस असो., यांनी सभेत सांगीतले. यावर तसा प्रस्ताव त्वरीत प्रा.अ. मऔविमं. यांनी त्यांच्या मुख्यालयास सादर करण्याच्या सुचना मा. अध्यक्षांनी दिल्या.<br>**कार्यवाही :- प्रा.अ. मऔविमं.** |

| | | |
|---|---|---|
| १० | MIDC आकोट येथील समस्यांबाबत- (आकोट एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशन) | एमआयडीसी आकोटमध्ये नवीन भुखंड वितरीत करण्यांसाठी शिल्लक नाही त्यामुळेउद्योग घटक एमआयडीसी बाहेर विकसीत होत आहे. परंतू त्यांना अनुषंगीक सुविधा उपलब्ध होत नाहीत व MIDC अकोट मध्ये 11500 चौमी जागा महाबीज अकोला यांनी गेल्या ९ वर्षापूर्वी खरेदी केली असून, आतापर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही. तरी सदहू 11500 चौ.मी. जागा MIDC यांनी ताब्यात घेवून नवीन उद्योग घटकांना वाटप करावी असे सचिव, आकोट MIDC इंडस्ट्रीज असोसिएशन यांनी सभेत सांगीतले होते. यावर महाबीज अकोला यांना कारणे दाखवा नोटीस देण्याच्या मा. अध्यक्षांनी विभागीय अधिकारी मऔविमं. यांना मागील सभेत सुचना दिल्या नंतर ही MIDC यांनी अद्याप पावेतो कोणतीही कार्यवाही न केल्याबाद्दल मा. अध्यक्षांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. तसेच उद्योजकांच्या मागणी नुसार आकोट MIDC करीता अतिरिक्त जागेचा प्रस्ताव MIDC नी उपविभागीय अधिकारी (महसुल) यांना पाठवावा तसेच याबाबत करण्यात येणा-या कार्यवाहीची प्रत आकोट MIDC इंडस्ट्रीज असो. आकोट यांना द्यावी असे मा. अध्यक्षांनी मऔविमं. प्रतिनिधींनी यांना सुचना दिल्या होत्या.<br>**अकोट औद्योगिक क्षेत्रातील वसाहतीत महाबीजला कारणे दाखवा नोटीस देण्यात असता महाबीजने त्यांचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित असल्याचे त्यांचे दि. ०१/०६/२०११ चे पत्रानुसार कळविले असल्याचे सभेत सांगण्यात आले. तसेच उद्योग घटक हा शासनाशी संबधीत उपक्रम असल्यामुळे त्या दृष्टीकोनातुन मुदतवाढ दयावी लागेल व अतिरिक्त जागेचा प्रस्ताव उप विभागीय अधिकारी (महसुल) यांना लवकरच सादर करण्यात येईल असे क्षेत्र व्यवस्थापक यांनी सभेत सांगितले. महाबिज उद्योग सुरु करण्याकरीता पुढाकार घेत आहे त्यामुळे भुखंड इतरांना हस्तांतरीत करु नये अशा सुचना मा. अध्यक्षांनी दिल्या.**<br>**कार्यवाही :- प्रा.अ. म.औ.वि.मं.** |
| १२ | आकोट एमआयडीसी येथील २ कि.मी चा रस्ता दुहेरी करण्याबाबत | देखभाल व दुरूस्तीसाठी सदर जागा MIDC यांनी जिल्हा परिषद कडून ताब्यात घेतली असून, सप्टेबर 2011 पर्यन्त प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल असे MIDC प्रतिनिधींनी सभेत सांगीतले. यावर सदरहू जागेचे MIDC यांनी सर्वेक्षण करावे असे मा. अध्यक्षांनी सांगीतले होते.<br>**याबाबत चर्चा झाली असता सदर रस्ता वस्तीमधुन जात असुन रस्त्यासाठी सोडण्यात आलेली जागा कमी असल्यामुळे या रस्त्याचे दुहेरीकरण शक्य नसल्याचे उप अभियंता मऔविम यांनी सभेत सांगितले. (विषय बंद)**<br>**कार्यवाही :- उप अभियंता, मऔविमं.** |
| १३ | जिल्हा उद्योग केंद्राकडून उद्योजकांना देण्यांत येणा-या पात्रता प्रमाणपत्राकरीता N.A. बाबत | सामुहीक प्रोत्साहन योजने करीता पात्रता प्रमाण पत्र देण्यासाठी औद्योगिक वापरा करीता जमीनीचा अकृषक **(N.A.)** परवाना अनिवार्य असल्याचे महाव्यवस्थापक, जिउके, अकोला यांनी सांगीतले होते. परंतू प्रस्तावित जागेबाबत नगर नचना विभागाने नाहरकत प्रमाणपत्र दिल्यास जागा खरेदीकरीता मुद्रांक शुल्कमाफी करीता प्रमाणपत्र देता येते, परंतू प्रादेशिक विकास आराखडा मंजुर नसल्यामुळे नगर नचना विभागाकडून नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येत नसल्याने उद्योजकांना मुद्रांक शुल्क सवलत देण्यात जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयास अडचणी होत आहे. यावर उद्योजकांच्या अडचणींची दखल घेवून शासन स्तरावर शहर आराखडा (Town Planning Map) शासनाकडून मंजुर करून घेण्याकरीता नगर रचना विभाग, अकोला यांना मागील सभेत सांगितले होते.<br>**नकाशा मंजुरीसाठीचा प्रस्ताव मा. प्रधान सचिव, नगर विकास, मंत्रालय मंबई यांचेकडे पाठविण्यात आले असुन १ ते २ महिन्यात मंजुर होण्याची शक्यता प्रतिनिधी, नगर रचना विभाग, अकोला यांनी सभेत सांगितले. याबाबत मा. अध्यक्षांनी आराखडा मंजुरी बाबत शीघ्र पाठपुरावा करण्याच्या सुचना त्यांना दिल्या. ार्यवाही :- नगर रचना विभाग** |

| | | क |
|---|---|---|
| १४ | आकोट खादी ग्रामोद्योग वसाहत बाबत. | आकोट येथील खादी ग्रामोद्योग वसाहती करीता एकुण ३५ असून फैकी ३२ भुखंड १० वर्षापुवी वाटप झाले असून, अद्याप पावेतो एकही उद्योग घटक सुरू झालेला नसल्याचे खादी ग्रामोद्योगाच्या प्रतिनिधींनी सभेत सांगीतले. यावर सभेस हजर SDPO यांनी आश्चर्य व्यक्त करून ७-८ वर्षापासून खादी ग्रामोद्योग कशाची वाट बघत होते.सदर भुखंड अद्याप पावेतो परत का घेतले नाही ? तसेच सदर भुखंड ७-८ वर्षापुर्वी वाटप करून सुध्दा अद्याप पावेतो त्या जागेवर एकही घटक सुरू न झाल्यावर खादी ग्रामोद्योग कार्यालयाने कोणती कार्यवाही केली याबाबत सभेस अवगत करावे. हयाबाबत घटकास वारंवार पत्र व्यवहार करून ही उद्योजक घटक सुरू करण्यास ईच्छूक नसल्याचे श्री. वानखडे, खादी ग्रामोद्योग यांनी सांगीतले होते. यावर सदर भुखंड तात्काळ परत घेण्याची कार्यवाही खादी ग्रामोद्योग व मऔविमं. यांनी करावी असे अध्यक्षांनी संबंधीतास आदेश दिले होते.<br>**अकोट लघु औद्योगिक क्षेत्रातील खादी ग्रामोद्योग वसाहतीमधील भुखंड जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांच्या शिफारसीने वाटप करण्यात येवुन सदर भुखंड धारकास भुखंड विकासाचा ५ वर्षाचा कालावधी संपुष्टात आलेला आहे. अशा १९ भुखंड धारकांना पुनश्‍च कारणे दाखवा नोटीस देण्यात आल्याच्या क्षेत्र व्यवस्थापक यांनी सभेत सांगीतले. अजुन दोन-दोन नोटीस दयावयाच्या असुन २-३ महिन्यापर्यत प्रक्रिया पुर्ण होईल असे सभेत सांगण्यात आले. याबाबत त्वरीत कार्यावाही करण्याच्या सुचना मा. अध्यक्षांनी दिल्या.**<br>**कार्यवाही :- खादी ग्रामोद्योग / मऔविमं.** |
| १५ | आकोट एमआयडीसी मधून जात असलेल्या नाल्याबाबत. | **अकोट औद्योगिक वसाहत पुर्ण पणे नाल्याच्या अलिकडे आहे. नाला एमआयडीसीच्या हददीबाहेर आहे. त्यामुळे त्यावर बांधकाम करणे आमच्या स्तरावर नसल्याचे उप अभियंता एमआयडीसी यांनी सभेत सांगितले. यावर ग्राम पंचायत वा जिल्हा परिषद यांचेशी संपर्क करावा अशा सुचना मा. अध्यक्षांनी दिल्या.** |
| १६ | मे. श्री. ब्रिक्स, एमआयडीसी आकोट येथील भुखंडावर झालेल्या बांधकामाची BCC मिळणेबाबत | कारखान्याच्या तिन्ही बाजूने कंपाउंड वाल घटकाने बांधून घेतल्यास BCC देता येईल असे मऔविमं.चे प्रतिनिधींनी सभेत सागंतले. यावर शेतकरी व MIDC मध्ये समझौता झाल्यानुसार पुल MIDC बांधून देणार असे श्री. चांडक, यांनी सांगीतले. प्रस्ताव करून MIDC ने पुल बांधावा असे अध्यक्षांनी मागील सभेत सांगितले होते.<br>**सदर औद्योगिक घटकाची बी.सी.सी. प्रमाणपत्राबाबत पाहणी करण्यात आलेली असुन त्यातील त्रृटीबाबत सविस्तररीत्या विभागीय कार्यालयाचे पत्र क्र. २८८५ दि.२५/०५/२०११ कळविण्यात आल्याचे उपअभियंता एमआयडीसी यांनी सांगितले. तथापी सदर विषय बरेच दिवसापासुन प्रलंबित असल्यामुळे त्वरीत कार्यवाही करावी अशी सुचना महाव्यस्थापक जिल्हा उद्योग केंद्र यांनी केली. याबाबत गांभीर्याने कार्यवाही करण्याचे निर्देश मा. अध्यक्षांनी दिले.**<br>**कार्यवाही :- मऔविमं.** |

| | | |
|---|---|---|
| १७ | Information on Industries based on Fly-Ash at Fly-Ash cluster in Chandrapur | MIDC ने घटकास Land acquire करून क्लस्टर बनवावे असे श्री. कमलेश वोरा VCC यांनी सुचविले. याकरीता बाळापूर येथे २०० एकर जागा घेण्याबाबत प्रस्ताव तयार करण्याचे R.O. MIDC यांनी सुरू केले आहे असे सहाय्यक क्षेत्र व्यवस्थापक, मऔविमं. यांनी मागील सभेत सांगीतले होते.<br><br>**Fly Ash Cluster करीता बाळापुर येथे दि. २४/०६/२०११ रोजी मंडळ अधिकारी यांचे समवेत जागेची पाहणी करण्यात आली असुन पाहणी करण्यात आलेल्या जागेचा अहवाल क्षेत्र व्यवस्थापक, अकोला कार्यालयाकडुन प्रादेशिक अधिकारी कार्यालयास पत्र क्र. ६६० दि. २४/०६/२०११ च्या पत्रान्वये पाठविण्यात आल्याचे सभेत सांगण्यात आले. पारस मोठया प्रमाणात Fly Ash असल्यामुळे Fly Ash वर आधारीत उद्योग सुरु करुन औद्योगिक समुह निर्माण करण्यास चालना देण्याकरीता एमआयडीसी व जिल्हा उद्योग केंद्राने प्रयत्न करावे अशी सुचना श्री. अशोक दालमिया अध्यक्ष, विदर्भ चेंबर यांनी केली. याबाबत मा. अध्यक्षांनी सुध्दा स्थानिक लोकांना प्राधान्य देवुन एमआयडीसीने Fly Ash उद्योगाकरीता जागा उपलब्ध करुन देण्यात यावी व उपविभागीय अधिकारी याचेकडे पाठपुरावा करावा अशा सुचना दिल्या.**<br>**कार्यवाही :- मऔविमं.** |
| १८ | तहसीलदार अकोला यांचेकडून फुड ग्रेन व इतर परवाने विलंब होणे बाबत | **पुर्वी जुन्या घटकांना परवाने दिले असतील परंतु साठे परवाना देतांना ज्यांना परवाने निर्गमित करण्याचे अधिकार आहेत त्यांनाच ते देता येत असुन पुर्वी दिलेल्या परवान्याची शहनिशा संघटनेच्या एक प्रतिनिधीनी प्रत्यक्ष कार्यालयात जावुन पाहणी करुन करावी असे मा. अध्यक्ष यांनी निर्देश दिले. याकरीता उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांना सभेमध्ये बोलविण्यात येवुन त्यांच्यासोबत चर्चा करण्यात आली. दुस-याच्या कार्यक्षेत्रात परवाने देणे नियमबाहय होते. तसे करता येत नसल्याचे मा. जिल्हाधिकारी यांनी सांगितले.** |
| १९ | अकोला महानगर पालीका येथील अग्नीशमन विभागाबाबत. | अकोला महानगर पालीका येथील अग्नीशमन विभागाकडे पुरेशा सुविधा उपलब्ध नाहीत असे श्री. कमलेश वोरा VCC यांनी सांगीतले असता, यावर श्री. राजीव बजाज यांनी सांगीतले की ते स्वतः दोन वेळा अग्नीशमन विभागाकडे प्रत्यक्ष जावून त्यांना हयाबाबत समजावून सांगीतले तरीही अग्नीशमन विभाग काहीही करण्यास असमर्थता दर्शवित आहे. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बरोबर नसल्यामुळे अग्नीशमन विभागाची ही परिस्थिती आहे. असे मनपा अधिका-यांनी सभेत सांगीतले. यावर अकोला महानगर पालीकेला उद्योजकांची मागणी कळवावी असे अध्यक्षांनी सांगितले होते.<br>**महानगरपालीकेची परिस्थिती बिकट असुन संघटनेनी १ नविन गाडीची मागणी केलेली आहे. त्यावर संघटना गाडीवर देखभाल व इत्यादीचा खर्च उचलत असेल तर तसा प्रस्ताव महानगरपालीकेस पाठविण्याच्या सुचना मा. अध्यक्ष यांनी संघटनेस दिल्या. औद्योगिक क्षेत्रामध्ये आगी लागुन नुकसान लागुन बरेच नुकसान झाले असल्याच्या घटना झालेल्या असल्यामुळे त्या करीता वेगळी मागणी करण्याची आवश्यकता नसल्याचे श्री. अशोक दालमिया व श्री. राजेश अग्रवाल, संघटनांचे अध्यक्ष यांनी नमुद केले.**<br>**कार्यवाही :- अकोला मनपा. / औद्योगिक संघटना** |

| | | |
|---|---|---|
| २० | एमआयडीसी मध्ये प्लॉटवर स्टॅम्प डयुटी आकारण्याच्या चुकीच्या पध्दतीमुळे उद्योजकांना आर्थिक भुर्दंड भरावा लागत असल्याबाबत. | याबाबत अस्तित्वात असलेल्या बांधकामावर स्टॅम्प डयूटी लावावी असे श्री. राजीव बजाज, अध्यक्ष AIA यांनी सांगीतले. MIDC कडे Valuation तयार नसल्यामुळे Process मध्ये विलंब होतो. Stamp Duty प्रमाणपत्रासाठी adjudication विलंब होत असल्यामुळे Valuation चे काम MIDC ने आधीच करून ठेवावे असे श्री. कमलेश वोरा VCC यांनी सांगीतले. जेणे करून adjudication करण्याची गरजच भासणार नाही. यावर भुखंड / घटक विक्रीचे वेळी ताबडतोब Spot Verification करावे जेणे करून करून उद्योजकांवर आर्थिक तान पडणार नाही असे अध्यक्षांनी सुचविले तसेच याबाबत MIDC ने वरीष्ठ स्तरावर चर्चा करून ही Process बंद करणेबाबत केलेल्या कार्यवाही बाबत मा. जिल्हाधिकारी व असो.ला ७ दिवसाचे आंत कळवावे असेही अध्यक्षांनी पुढे सांगीतले.<br>**एमआयडीसी क्षेत्रामध्ये जागेची किंमत / प्रिमियम हे महामंडळाने ठरवलेले असुन ते शासनाच्या धोरणानुसार असल्यामुळे तेथे बाजाभाव किंमत ही मुद्रांक शुल्काकरीता गृहीत धरु नये अशी मागणी औद्योगिक संघटनेनी केली व त्यानुसार उप निंबधक मुद्रांक यांनी एमआयडीसीचेच दर ग्राहय धरल्या जातील मान्य केले तसेच मुद्रांक शुल्क करीता Adcution करीता लागणारा कालावधी मोठा असल्यामुळे आधिच व्हॅल्युऐशन करावे अशी मागणी उद्योजकांनी केली. यावर एमआयडीसी च्या अधिका-यानी चर्चा करुन सदर विषय त्वरीत निकाली काढण्याच्या सुचना मा. अध्यक्षांनी दिल्या**<br>**कार्यवाही :- उप निंबंधक मुद्रांक शुल्क विभाग.** |
| २१ | <u>सिड कार्पोरेशन ते ट्रान्सपोर्टनगर एमआयडीसी-४ रस्ता रुंदीकरणाबाबत.</u> (विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स) | सदर रस्ता शिवणी - शिवापुर गावामधुन जात असुन रहदारीचे प्रमाणे दिवसेंदिवस वाढत आहे. दोन्ही बाजुनी येणारे वाहन सहजासहजी क्रॉस करता येत नाही. त्यामुळे अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदर रस्ता रुदीकरणाबाबत योग्य कार्यवाही करावी.<br>**सदर रस्ता शिवणी गावामधुन जात असुन जिल्हा परिषद, अकोला यांच्या मालकीत आहे. त्यामुळे सबंधीत ग्राम पंचायत व जिल्हा परिषद अकोला यांनी सयुंक्तपणे त्वरीत कार्यवाही करावी असे मा. अध्यक्षांनी निर्देश दिलेत.**<br>**कार्यावाही :- उप अभियंता, सा.बा.जि.प.** |
| २२ | <u>अकोला विमानतळ धावपटटी विस्तारीकरणाबाबत.</u> | शहराच्या विकासाकरीता प्रवासी विमान वाहतुक अत्यंत आवश्यक बाब होत आहे. अकोला विमानतळाच्या मर्यादित धावपटटीमुळे प्रवासी वाहतुकीस अडचण निर्माण होत आहे. बाभुळगांव लगतची जागेकरीता धावपटटीच्या विस्तारीकरणाकरीता प्रयत्न केल्यास भविष्यात प्रवासी वाहतुक सुरु होण्यास मदत होईल याबाबत प्रयत्न होणे आवश्यक आहे.<br>**हयाबाबत सद्यस्थितीतील धावपटटीच्या समोरच्या बाजुने राज्य महामार्ग व मागच्या बाजुने PKV चे सरोवर / प्रशासकिय इमारत येत असल्यामुळे त्यामध्ये वाढ करणे शक्य नसल्याचे सांगण्यात आले. तथापी सदर धावपटटी ४५ डिग्रीने वळविल्यास जागा ताब्यात घेण्यासोबतच धावपटटी तयार करण्यावर अतिरिक्त खर्च करावा लागेल असे सांगण्यात आले. तथापी मा. अध्यक्षांनी विमान प्राधिकरणाच्या पदाधिकारी यांचेशी भ्रमणध्वनीवरुन चर्चा केली. विमान प्रधिकरणाचे अधिकारी त्याच दिवशी (२१/१०/२०११) सांयकाळ नंतर मा. अध्यक्षांसोबत प्रत्यक्ष चर्चा करणार असल्याचे मा. अध्यक्ष यांनी सभेत सांगितले. (<u>विषय बंद</u>)** |

| | | |
|---|---|---|
| २३ | टिळक रोडवरील मंगलदास मार्केट रस्त्यावरील जड वाहतुकीमुळे होणारा अडथळयाबाबत | टिळक रोड वरील मंगलदास मार्केट हे अकोला शहरातील मुख्य व्यापारी क्षेत्र असुन तेथे नेहमी वाहनांची वरदड असते. खासकरुन दुपारी व सांयकाळी वाहतुकीस अडचण निर्माण होते. तेव्हा टिळक रोडवर जड वाहनांना वरील कालावधीमध्ये प्रतिबंध लावण्यात यावा.<br>**हयाबाबत संबंधीत ट्रॅफिक पोलीस / RTO यांनी योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश मा. अध्यक्ष यांनी उप विभागीय पोलीस अधिकारी यांना दिल. (विषय बंद)**<br>**कार्यवाही :- पोलीस विभाग** |
| २४ | सण उत्सव काळात अकोला शहरातील सांयकाळचे भारनियमन बंद करण्याबाबत. | सणासुदीचा काळामध्ये सांयकाळच्या वेळेस ग्राहक मार्केटमध्ये खरेदीकरीता फिरत असतात तेव्हा जनतेच्या सुरक्षेच्या दृष्टीने सांयकाळी ६ नंतर भारनियमन करुण्यात येवु नये. याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला सुचित करण्यात यावे.<br><br>**याबाबत "तेलंगणा" आंदोलनामुळे आवश्यक त्या प्रमाणात कोळसा उपलब्ध होवु शकत नसल्यामुळे तसेच आवश्यक तो विद्युत भार उपलब्ध होवु शकत नसल्यामुळे भार नियमन करणे जिकरीचे ठरतअसल्याचे MSEDCL च्या अधिका-यांनी सागीतले. तथापी येत्या दिवाळीच्या काळात कमीत कमी भार नियमन कसे करता येईल याबाबत MSEDCL प्रयत्नशिल असल्याचे सभेत सांगितले. (विषय बंद)**<br>**कार्यवाही :- उपअभिंयता, म.रा.वि.वि.कं.** |
| २५ | एमआयडीसी - फेज ४ अकोला येथे मुलभुत सुविधा पुरविण्याबाबत | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत फेज -४ मध्ये आतापर्यत जवळपास १०० भुखंड वाटप केलेले आहेत. भुखंड वाटप होऊन सहामहिन्याचा कालावधी होऊन सुध्दा उद्योगाकरीता लागणा-या मुलभुत सुविधा जसे लाईट, पाणी पाईप लाईन, ईलेक्ट्रीक लाईट व रस्ते इत्यादी सुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे भुखंड धारकांना उद्योग उभारणीमध्ये अडचणी निर्माण होत आहेत.<br>**हयाबाबत फेज ४ मध्ये रस्ते दिवाबत्ती व पाणी पुरवठयाची सुविधा उपलब्ध आहेत. तथापी भुखंडाच्या नविन आराखडयामधील अंतर्गत रस्ते, दिवाबत्ती व जलवितरकेची कामे त्याकरीताच्या निविदा मंजुर होताच पुर्ण करण्यात येणार असल्याचे उप अभियंता , मऔविम यांचेकडुन सांगण्यात आले.**<br>**कार्यवाही :- उप अभियंता म.औ.वि.म.** |
| २६ | कारखाने निरिक्षक कार्यालय (औद्योगिक सुरक्षा व आरोग्य) | कारखाने निरिक्षक कार्यालयाकडुन देण्यात येणा-या परवान्याचे नुतनिकरण करण्याकरीता मुळ परवाना सादर करावा लागतो व परवाना नुतनिकरण करुन परत मिळण्याकरीता ब-याच कालावधी लागतो. तेव्हा विहित कालावधीमध्ये परवान्याचे नुतनिकरण करुन मिळावेत.<br>**कार्यालयीन कर्मचारी अपुरा असुन बरेच पद रिक्त आहे. त्यामुळे परवाना नुतनिकरण करीता वेळ लागत आहे. नोव्हेंबर- डिसेंबर पर्यत सर्व प्रलंबित परवान्याचा निपटारा करण्यात येईल असे औद्योगिक सुरक्षा व आरोग्य अधिकारी यांनी सभेत सांगितले. ( विषय बंद)**<br>**कार्यवाही :- औद्योगिक सुरक्षा व आरोग्य** |

| | | |
|---|---|---|
| २७ | औद्योगिक क्षेत्र एमआयडीसी मध्ये आकारण्यात येणा-या मुद्रांक शुल्काबाबत. (मे. श्री उद्योग, अकोला -विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अॅन्ड इंडस्ट्री) | एमआयडीसी ने पाच वर्षाच्या कालावधीकरीता भुखंड लिजवर वितरीत केलेला असुन सहनिबंधक वर्ग - १ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी सदर जागेचे बाजार मुल्याप्रमाणे रु. ३०६७५/- एवढया रुपयाचे मुद्रांक शुल्क देय ठरविलेले आहे.<br>मुद्रांक शुल्क सवलत ही भुखंडावर दिल्या जाते इमारतीवर दिल्या जात नसुन. एकदया प्रकरणामध्ये चुकीने बाजार मुल्याप्रमाणे मुद्रांक शुल्क लावण्यात असेल असे सह निबंधक यांनी सभेत सांगितले. सदर प्रकरणाची शहानिशा करुन योग्य व नियमानुसार मुद्रांक शुल्क लावण्याच्या सुचना मा. जिल्हाधिकारी यांनी दिल्या. **(विषय बंद)** |
| २८ | मे. ट्रान्सलाईन प्रॉडक्ट, अकोला घटकाचे विद्युत शुल्क (Duty) माफी बाबत. (मे. ट्रान्सलाईन प्रॉडक्ट, अकोला) | सामुहिक प्रोत्साहन योजना -२००७ अंतर्गत सदर घटकाला पात्रता प्रमाणपत्र देण्यात आलेले असुन घटकाने विद्युत शुल्क (Duty) माफी करीता आवश्यक कागदपत्राची पुर्तता करुन सुध्दा तीन महिन्याचा कालावधी उलटुन सुध्दा विद्युत शुल्क हे विद्युत देयकामध्ये लागुन येत आहे.<br>**विद्युत निरिक्षक, अमरावती यांचे पत्र क्र. ७५४ दिनांक ०६/०६/२०११ अन्वये अधिक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं. लि. यांना विद्युत शुल्क माफ करण्याबाबत कळविले आहे असे सभेत सांगण्यात आले. ( विषय बंद)** |
| २९ | दाल, तेलबिया, अन्न धान्य साठवण्यासाठी स्वंतत्र परवाने घेण्याबाबत. (दि ग्रेन मर्चंट असोसिएशन अकोला) | तहसिलदार, अकोला यांनी दिलेल्या आदेशानुसार एमआयडीसी क्षेत्रामध्ये दाल, तेलबिया, अन्न धान्य साठवण्यासाठी स्वंतत्र परवाने घेण्याबाबत कळविलेले आहे.<br>**हयाबाबत एकाच प्रतिष्ठाणचे वेगवेगळया ठिकाणी गोडावुन असल्यामुळे त्यांना त्याप्रमाणे वेगवेगळे परवाने घेणे त्रासदायक आहे असे मत संघटनेकडुन व्यक्त करण्यात आले असता त्या-त्या भागाकरीताच्या कार्यक्षेत्रानुसार त्या त्या अधिका-याकडुन वेगवेगळे परवाने घेणे आवश्यक असल्याचे संबंधीत अधिका-यांनी सभेत सांगितले असता हयाबाबत पडताळणी / शाहनिशा करुन त्यानुसार अहवाल सादर करण्याचे निर्देश मा. अध्यक्षांनी दिलेत.** |
| | | मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे सभेत सांगण्यात आले. |

अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी,
जिल्हा उद्योग मित्र समिती सभा
अकोला

महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव
जिल्हा उद्योग मित्र समिती सभा
अकोला

**जिल्हा उद्योग केंद्र, अकोला**

**दिनांक २१.१०.२०११ रोजी संपन्न झालेल्या स्थानिक लोकांना रोजगार समिती सभेचे कार्यवृत्त.**

जिल्हा उद्योग मित्र समिती सभा **मा. श्री. परिमल सिंह, जिल्हाधिकारी, अकोला** यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २१/१०/२०११ रोजी संपन्न झाली. सर्व प्रथम मा. जिल्हाधिकारी, यांचे महाव्यवस्थापक यांनी स्वागत केले. मा. अध्यक्ष महोदयांचे परवानगीने विषयसुचिनुसार सभेस सुरूवात करण्यांत आली.

**मागील सभेतील प्रलंबीत मुद्यं**

| मुद्या क्रमांक | सभेचा विषय | सभेमध्ये झालेली चर्चा |
|---|---|---|
| | **स्थानिक लोकांना रोजगार : -** | औद्योगिक विकासातून जिल्हयातील स्थानिक लोकांना जास्तीत जास्त रोजगार मिळावा या दृष्टीकोणातून स्थानिक लोकांना नोक-यामध्ये प्राधान्य देण्यांचे शासनाचे धोरण असून सर्व उद्योग घटकांनी पर्यवेक्षकिय श्रेणीत किमान ५० टक्के व अपर्यवेक्षकीय सहीत इतर श्रेणीत किमान ८० टक्के कर्मचारी नियुक्त करण्यांबाबत शासन निर्णयाद्वारे कळविण्यांत आलेले आहे. तरी हयाबाबत सर्व उद्योजकाना औद्योगिक संघटनेद्वारे कळविण्यांत यावे. असे महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, अकोला यांनी सांगीतले. मा. अध्यक्ष यांनी औद्योगिक घटकांकडून प्राप्त झालेल्या माहितीचा आढावा घेतला व संपूर्ण घटकांकडून माहिती प्राप्त करून घेण्याचे निर्देश महाव्यवस्थापक यांना दिले. आतापर्यत प्राप्त सर्व लघु उद्योग तसेच मोठे उद्योगांमध्ये किमान ८० % स्थानिक रोजगार आहेत. सर्व नोंदणीकृत घटकांकडून स्थानिक लोकांना रोजगार करीता विहीत नमुन्यात माहिती जिल्हा उद्योग केंद्र, मार्फत गोळा करण्यांत येते. |

अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी,
स्थानिक लोकांना रोजगार समिती
अकोला

महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव
स्थानिक लोकांना रोजगार समिती
अकोला

**जिल्हा उद्योग केंद्र, अकोला**

**दिनांक २१.१०.२०११ रोजी संपन्न झालेल्या आजारी व बंद उद्योग समिती सभेचे कार्यवृत्त.**

जिल्हा उद्योग मित्र समिती सभा **मा. श्री. परिमल सिंह, जिल्हाधिकारी, अकोला** यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २१/१०/२०११ रोजी संपन्न झाली. सर्व प्रथम मा. जिल्हाधिकारी, यांचे महाव्यवस्थापक यांनी स्वागत केले. मा. अध्यक्ष महोदयांचे परवानगीने विषयसुचिनुसार सभेस सुरूवात करण्यांत आली.

**मागील सभेतील प्रलंबीत मुद्दे**

| मुद्दा क्रमांक | सभेचा विषय | सभेमध्ये झालेली चर्चा |
|---|---|---|
| | **आजारी व बंद उद्योगाबाबत -** | सदर विषयाबाबत सभेमध्ये चर्चा झाली असून, मागील काही वर्षात एकाही घटकास आजारी उद्योग प्रमाण पत्र देण्यांत आले नसल्याचे महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, अकोला यांनी सभेत सांगीतले. जिल्हा उद्योग केंद्राने केलेल्या सर्वेक्षणानुसार बरेच घटक आजारी किंवा बंद आहेत तथापी बँकेमार्फत रिहॅबीलीटेशन पॅकेज देण्यात येत नसल्यामुळे शासनाचे योजनेचा फायदा उद्योजकांना मिळत नसल्याचे त्यांनी सांगीतले. तसेच बंद घटकांची माहिति संकलन करण्याकरीता मऔविमं. यांनी व औद्योगिक संघटनेने सहकार्य करावे अशी विनंती त्यांनी केली. |

अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी,
आजारी व बंद उद्योग समिती
अकोला

महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव
आजारी व बंद उद्योग समिती
अकोला